सत्यमेव जयते

महाराष्ट्राचे राज्यपाल

# माननीय श्री. एस. एम. कृष्णा

यांचे

# अभिभाषण

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

१३ मार्च २००६

**सभापती महोदय, अध्यक्ष महाराज आणि सन्माननीय सदस्यहो,**

राज्य विधानमंडळाच्या २००६ या वर्षाच्या पहिल्या अधिवेशनात मी आपल्या सर्वांचे मन:पूर्वक स्वागत करतो.

**२.** भारताचे माजी राष्ट्रपती श्री. के. आर. नारायणन यांच्या दु:खद निधनामुळे राष्ट्राची मोठी हानी झाली आहे. मी त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.

**३.** गतवर्षी, जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत, राज्यातील बहुतेक सर्वच जिल्ह्यांत अतिवृष्टी झाली. या आपत्तीमुळे आपद्ग्रस्त भागातील जनजीवन विस्कळित झाले आणि मोठया प्रमाणावर प्राणहानी व वित्तहानी झाली. राज्यातील जनतेने, विशेषत: मुंबईकरांनी, ह्या आपत्तीचा धैर्याने सामना केला व आपद्ग्रस्तांना सढळहस्ते सर्वतोपरी मदत केली. या आपत्तीच्या काळात राज्यातील जनतेने बंधुभावाचे व एकजुटीचे जे अभूतपूर्व दर्शन घडविले, त्याचे वर्णन करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत.

४. या आपत्तीमध्ये १२०० पेक्षा जास्त व्यक्ती व २७ हजार पेक्षा जास्त जनावरे मृत्युमुखी पडली. सुमारे सहा लाख घरांची पडझड झाली व सतरा हजार घरे पूर्णत: पडली. याशिवाय, आठ लाख हेक्टरपेक्षा जास्त जमिनीवरील उभ्या पिकांचे नुकसान झाले. नदीकाठची बहुतांश शेतजमीन पुरामुळे वाहून गेली आणि सार्वजनिक रस्ते, पाणीपुरवठा योजना व इमारती इत्यादींसारख्या नागरी सुविधांची मोठी हानी झाली.

**५.** आपद्ग्रस्तांना मदत करणे हे प्रथम कर्तव्य मानून माझ्या शासनाने, आपद्ग्रस्तांना एकूण ४५० कोटी रुपयांचे सानुग्रह अनुदान आणि सर्वच आपद्ग्रस्त कुटुंबीयांना प्रत्येकी २० किलो अन्नधान्य व १० लिटर केरोसिन यांचे मोफत वाटप केले. तसेच, प्रचलित निकष शिथिल करून, आपद्ग्रस्त

शेतक-यांना, त्यांच्या उभ्या पिकांच्या नुकसानीपोटी एकूण ४५० कोटी रुपयांची मदत दिली. या मदतकार्यासाठी माझ्या शासनाने आत्तापर्यंत सुमारे १२०० कोटी रुपये खर्च केला आहे. आपद्ग्रस्त भागांतील गावांचे दीर्घकालीन पुनर्वसन करण्याबाबतचा निर्णयही शासनाने घेतलेला आहे.

**६.** मुंबईमध्ये भविष्यात पुन्हा अशी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून, माझ्या शासनाने, दिनांक १९ ऑगस्ट, २००५ रोजी **मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची** स्थापना केलेली आहे. या प्राधिकरणाने, मिठी नदीच्या पात्राची खोली व रुंदी वाढविणे तसेच प्रवाहातील अडथळे दूर करणे इत्यादी तातडीची कामे हाती घेतली आहेत. भविष्यात उद्भवणा-या नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी माझ्या शासनाने, **महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची** स्थापना केली आहे. गटारे, मलप्रवाह, तसेच नाले तुंबण्यास मुख्यतः प्लॅस्टिकच्या पातळ पिशव्या कारणीभूत असतात. या पिशव्यांचा वापर आरोग्य व पर्यावरणाच्या दृष्टीने घातक असल्याने, माझ्या शासनाने, ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या व ८ × १२ इंच या आकारापेक्षा कमी आकाराच्या प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा वापर करण्यावर बंदी घातली आहे.

**७.** राज्यात वारंवार पडणारा दुष्काळ, शेतीवरील वाढता खर्च, शेतीचे अत्यल्प उत्पादन व त्यामुळे येणारा कर्जबाजारीपणा, यामुळे काही जिल्ह्यांत शेतक-यांचे जीवन असह्य झाले असून तेथील शेतक-यांनी आत्महत्त्या केल्या असल्यामुळे शेतक-यांची ही गंभीर समस्या सोडविण्याचा माझ्या शासनाने निर्णय घेतला आहे. म्हणून, शासनाने, कापूस उत्पादक शेतक-यांसाठी एक विशेष एकत्रित सवलत योजना जाहीर केली आहे. या योजनेनुसार, शेतकऱ्यांना २ हेक्टरपर्यंत प्रति हेक्टर १०००/- रुपये याप्रमाणे रोखीने मदत देण्यात येईल. तसेच, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा या जिल्ह्यांतील शेतक-यांच्या २५ हजार रुपयांपर्यंतच्या थकित अल्पमुदती कर्जाच्या परतफेडीसाठी कालावधी नव्याने ठरवून देण्यात येईल. याशिवाय, शेतकऱ्यांना तारण न घेता व सवलतीच्या व्याजदराने २५ हजार रुपयांपर्यंतचे कर्ज देण्याचा निर्णय सुद्धा माझ्या शासनाने घेतला

आहे. तसेच, कापूस एकाधिकार योजनेअंतर्गत असलेला ७५० कोटी रुपये भांडवल निधी १२ टक्के व्याजासह ३५ लाख शेतक-यांना परत करण्यात येईल. या सवलत योजनेअंतर्गत या सहा जिल्ह्यांतील शेतक-यांना २५ हजार रुपयांपर्यंत टप्प्याटप्प्याने अनुदान देण्यात येईल व सेंद्रीय शेतीसाठी त्यांना प्रोत्साहन देण्यात येईल. त्याचप्रमाणे, पूरक जोडधंद्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल. याशिवाय, सामूहिक विवाहात सहभागी होणाऱ्या जोडप्यास १० हजार रुपयांची मदत देण्यात येणार आहे व असे विवाह आयोजित करणा-या स्वयंसेवी संस्थांना खर्च भागविण्यासाठी प्रत्येक जोडप्यामागे १००० रुपये देण्यात येणार आहेत.

८. शेतक-यांच्या हिताकरिता ग्रामीण पतपुरवठा यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने, प्रा.वैद्यनाथन समितीचा अहवाल स्वीकारण्याचे ठरविण्यात आले आहे.

९. राज्यातील शेतक-यांना कृषि उत्पादनाचा किफायतशीर मोबदला मिळण्याकरिता महाराष्ट्र कृषि उत्पन्न (विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्यात आलेली असून, राज्यातील केळी व संत्री या फळांच्या निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी कृषि निर्यात क्षेत्राच्या उभारणीकरिता, माझ्या शासनाने, केंद्रीय प्राधिकरणाशी सामंजस्य करार केलेला आहे.

१०. मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी आहे. मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचा माझ्या शासनाचा निर्धार आहे. शासनाच्या याच प्रयत्नातून जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी क्षेत्र नवीकरण अभियान सुरू करण्यात आले आहे. भारत सरकारने प्रथमच आपल्या २००५-०६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात मुंबईच्या तीन मोठ्या प्रकल्पांसाठी तरतूद केली आहे. आतापर्यंत, मुंबई पर्जन्यजल व मलनिःसारण प्रकल्प, मध्य वैतरणा पाणी पुरवठा प्रकल्प, मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प, वांद्रे-वरळी सागरी जोडमार्ग प्रकल्प आणि मिठी नदी विकास प्रकल्प असे ११ हजार कोटी रुपये खर्चाचे काही महत्त्वाचे प्रकल्प केंद्रीय सहाय्यासाठी भारत सरकारला सादर करण्यात आले असून, नियोजन आयोगाबरोबर अलिकडेच झालेल्या बैठकीमध्ये चालू

वर्षात १००० कोटी रुपये तातडीने देण्याची मागणी केली आहे. परंतु, केंद्रीय अर्थसहाय्याची वाट न पाहता, माझ्या शासनाने, मुंबई नागरी सुविधा प्रकल्प, वांद्रे-वरळी सागरी जोडमार्ग व मुंबई नागरी परिवहन प्रकल्प यांसारखे महत्त्वाचे प्रकल्प अगोदरच राबविण्यास सुरुवात केली आहे. मुंबई महानगरपालिकेने देखील रस्ते दुरुस्तीचा मोठा कार्यक्रम हाती घेतला आहे. वरील प्रकल्पांशिवाय मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी निविदा प्राप्त झाल्या असून, शिवडी-न्हावा ट्रान्स हार्बर जलसेतू प्रकल्पासाठी निविदा मागविण्यात येत आहेत.

**११.** मुंबईला एक जागतिक दर्जाचे शहर बनविण्याकरिता मुंबईच्या विकास प्रकल्पांसाठी जागतिक बँक आणि जपान सरकार यांनी आर्थिक सहाय्य देण्याची तयारी दर्शविली असून, भारत सरकारने मुंबईला आंतरराष्ट्रीय आर्थिक केंद्र बनविण्यासाठी एक तज्ज्ञ समितीदेखील स्थापन केली आहे.

**१२.** माझ्या राज्याने देशात प्रमुख औद्योगिक राज्य म्हणून आपला लौकिक कायम राखला असून मागील ३ वर्षांमध्ये महाराष्ट्रातील औद्योगिक वाढीचा दर सरासरी ९% आहे. राष्ट्रीय स्थूल उत्पन्नामध्ये महाराष्ट्राचा १३% वाटा असून, देशाच्या एकूण निर्यातीच्या ३१% निर्यात महाराष्ट्रातून होते. महाराष्ट्र राज्यातून गेल्या दोन वर्षांत अनुक्रमे रुपये ८८ हजार कोटी व १ लाख ७ हजार कोटी इतकी निर्यात झालेली आहे.

**१३.** प्रगतिशील औद्योगिक धोरण, उत्कृष्ट पायाभूत सुविधा आणि उद्योग व व्यापारासाठी अनुकूल वातावरण यांच्या बळावर माझ्या राज्याने भारतीय तसेच विदेशी गुंतवणूकदारांचे प्रथम पसंतीचे राज्य म्हणून आपला लौकिक अबाधित राखला आहे. संसदेत वित्तमंत्र्यांनी सादर केलेल्या २००५-०६ च्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात नमूद केल्याप्रमाणे, थेट विदेशी गुंतवणुकीच्या प्रस्तावांबाबत महाराष्ट्र हे राज्यांच्या यादीत अग्रेसर राहिले आहे. ऑगस्ट १९९१ ते ऑगस्ट २००५ या कालावधीत देशात झालेल्या थेट विदेशी गुंतवणुकीच्या प्रस्तावांपैकी सर्वाधिक प्रस्ताव हे महाराष्ट्र राज्यातील गुंतवणुकीचे होते आणि सुमारे ५३,००० कोटी रुपयांच्या ३,८३३ गुंतवणूक

प्रस्तावांना मान्यता मिळाली होती. याच कालावधीत, एकूण १२,७०९ गुंतवणुकीच्या प्रस्तावांमध्ये सुमारे ३ लाख कोटी रकमेच्या गुंतवणुकीचे अंदाजे बावीस लाख लोकांना रोजगार मिळू शकेल असे प्रस्ताव राज्याला प्राप्त झाले आहेत. या गुंतवणुकीच्या प्रस्तावांची जलदगतीने अंमलबजावणी करण्यात येत असून, त्याचे प्रमाण देशात सर्वाधिक म्हणजे ४९% इतके आहे.

**१४.** भारत सरकारच्या पुढाकाराने आणि राज्य शासनाच्या सक्रिय पाठिंब्यामुळे, दीर्घकाळ प्रलंबित असलेला दाभोळ प्रकल्प आता रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने हाती घेतला असून, प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यामधून लवकरच वीजनिर्मिती सुरू होईल.

**१५.** राज्यात, खाजगी क्षेत्रांनी १२,५०० मेगावॅट विद्युतनिर्मितीची क्षमता असलेले वीज प्रकल्प प्रस्तावित केले असून, सात कंपन्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल प्राप्त झाले आहेत. २००६-०७ या वर्षात परळी, पारस आणि घाटघर येथील प्रत्येकी २५० मेगावॅट क्षमतेचे तीन प्रकल्प पूर्ण होतील.

**१६.** वीजनिर्मिती कंपनीने पुढील पाच वर्षांमध्ये सुमारे २९,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करून सुमारे ७५०० मेगावॅट इतक्या क्षमतेची, जादा वीजनिर्मिती करण्याची योजना तयार केली आहे. पारेषण कंपनीने, पारेषण क्षमतेचा जास्तीतजास्त वापर होण्याच्या दृष्टीने, पारेषण यंत्रणेत सुधारणा करण्यासाठी पुढील ५ वर्षांमध्ये सुमारे ४,९०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची योजना तयार केली आहे. तसेच, वितरण कंपनीने देखील राज्यातील वितरणाचे जाळे अधिक मजबूत करण्यासाठी पुढील पाच वर्षांकरिता ११,००० कोटी रुपयांची गुंतवणूक योजना आखली आहे.

**१७.** वितरण कंपनीने, गावठाण फिडर सेपरेशन, गावांना सिंगल फेज पुरवठा आणि अक्षय प्रकाश या योजनांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली असून, आत्तापर्यंत ७००० गावांना सिंगल फेज योजना लागू करण्यात आली आहे. २००६-०७ या वर्षात, सुमारे १० हजार अतिरिक्त गावे सिंगल फेज योजना आणि गावठाण फिडर सेपरेशन योजना या योजनांखाली आणण्यात

येणार आहेत. स्थानिक ग्राहकांच्या स्वयंस्फूर्त सक्रिय सहभागाने आतापर्यंत २५०० हून अधिक गावे अक्षय प्रकाश योजनेखाली आणण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे, पारंपरिक ऊर्जास्रोतांद्वारे विद्युतीकरण अशक्य असलेल्या जवळपास १६० अतिदुर्गम खेड्यांमध्ये आणि वस्त्यांमध्ये २००६-०७ या वर्षात अपारंपरिक ऊर्जास्रोतांद्वारे वीजपुरवठा करण्यात येईल.

१८. शासनाने, "**ऊर्जा अंकुर निधी**" या नावाचा निधी स्थापन करण्याचे जाहीर केले आहे. या निधीमधून पुढील तीन वर्षांमध्ये १००० मेगावॅट क्षमतेचे अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येतील.

१९. ग्राहकांना विजेचा पुरवठा व्यवस्थितपणे करण्यासाठी माझे शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. तरीसुध्दा विजेची मागणी पूर्णपणे भागविणे शक्य होत नाही म्हणून विजेची बचत करणारे नवनवीन उपाय योजणे अपरिहार्य झाले आहे. ही तीव्र वीजटंचाई लक्षात घेऊन आपण सर्वांनीच विजेचा वापर अत्यंत काटकसरीने करावा व ही परिस्थिती हाताळण्यासाठी शासन जे प्रयत्न करीत आहे त्यात शासनाला सहकार्य करावे, असे मी आवाहन करतो.

२०. माझे शासन, माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला विशेष प्राधान्य देऊन त्याद्वारे कार्यक्षम, परिणामकारक व पारदर्शक सेवा देण्यासाठी **क्षमतावृद्धी प्रकल्प** राबवीत आहे. शासनाने, राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स कृतियोजनेअंतर्गत, विविध नागरी सेवा पुरविण्यासाठी राज्यातील ६००० गावांमध्ये सामायिक सेवाकेंद्रे उभारण्याचा निर्णय घेतला आहे. भारत सरकारने फेब्रुवारी, २००६ मध्ये कोची येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स परिषदेत, आपल्या लेखा व कोषागार विभागाच्या "**कोषवाहिनी**" या माहिती तंत्रज्ञान प्रकल्पाला रजत आयकॉन पुरस्कार तर वर्धा जिल्ह्याने राबविलेल्या "**ग्रामदूत मिशन**" प्रकल्पाला ब्रॉंझ आयकॉन पुरस्कार मिळाला आहे.

२१. नक्षलवाद्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी माझ्या शासनाने, ऑगस्ट २००५ मध्ये "**आत्मसमर्पण योजना**" सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत, आत्मसमर्पित होणाऱ्या नक्षलवाद्यांना प्रोत्साहनात्मक आकर्षक बक्षिसे, त्यांच्या पाल्यांकरिता इयत्ता बारावीपर्यन्तचे मोफत शिक्षण व

उदरनिर्वाहाकरिता स्वयंरोजगार योजनेखाली विविध लाभ देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात येत आहे. नक्षलवादीविरोधी कारवाईमध्ये मृत्यू पावलेल्या, कायमस्वरूपी विकलांग झालेल्या आणि जखमी झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसांना देण्यात येणाऱ्या नुकसानभरपाईच्या रकमेत भरीव वाढ करण्यात आली आहे. तसेच, अशा कारवाईच्यावेळी मृत झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना भरघोस लाभ देण्यात आले आहेत.

**२२.** राज्यातील शेतकऱ्यांना बेकायदेशीर सावकारांकडून होणारा त्रास कमी करण्याच्या दृष्टिकोनातून सावकारी कायद्यांतर्गत प्रभावी मोहीम राबविण्यात आली असून, गेल्या वर्षभरात सुमारे ९४० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**२३.** शासनाने, १५ ऑगस्टपूर्वी मुंबईतील सर्व आस्थापनांमधून बालकामगार प्रथेचे उच्चाटन करण्याचे ठरविले असून, त्यासाठी एका संयुक्त कृतिदलाची स्थापना केली आहे. या योजनेची सुरुवात मुंबई व ठाणे जिल्ह्यांपासून झाली आहे.

**२४.** माझे शासन पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाची योजना राबवीत असून, पोलीसबलामध्ये वाढ करण्यासाठी पोलीस ठाण्यांच्या संख्येत वाढ करण्याचा तसेच पोलिसांची सुमारे १०,५०० इतकी नवीन पदे निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. शासनाने न्यायवैद्यक प्रयोगशाळेसाठी डीएनए तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले आहे. तसेच सायबर गुन्हे, आवाजावरून बोलणारी व्यक्ती ओळखणे, ध्वनिफितीची विश्वासार्हता तपासणे, अंमली औषधिद्रव्यांचे विश्लेषण, ब्रेन मॅपिंग व लाय डिटेक्टर चाचणी करणे इत्यादींसाठी देखील शासनाने सुविधा निर्माण केलेल्या आहेत. तसेच, नक्षलग्रस्त भागासाठी सुरुंगरोधक वाहने, स्पीड बोटी आणि अत्याधुनिक शस्त्रास्त्रे इत्यादी सुविधादेखील पुरविण्यात येणार आहेत.

**२५.** महाराष्ट्र राज्याच्या रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर भारत सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ करून महाराष्ट्राचा गौरव केला आहे. या राष्ट्रीय योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील धुळे, नंदूरबार,

अहमदनगर, औरंगाबाद, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, अमरावती, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली या १२ जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. माझ्या शासनाने, या दोन्ही अधिनियमांतील जास्तीतजास्त फायदेशीर असणाऱ्या तरतुदी एकत्रित करून, रोजगार मागणाऱ्या व्यक्तींसाठी एकात्मिक महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना दिनांक २ फेब्रुवारी, २००६ पासून सुरू केली आहे याचा मला आनंद होतो. राज्याची ही नवीन योजना देखील संपूर्ण देशास मार्गदर्शक ठरेल याची मला खात्री आहे.

**२६.** महाराष्ट्र राज्यातील पडीक जमिनींचा विकास करण्यासाठी शासनाने पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रमावर भर दिला आहे. मराठवाडा विभागातील कमी पाऊस, वृक्षराजीचा अभाव, पाणीटंचाई इत्यादींसारख्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीचा विचार करून, मराठवाडा पाणलोटक्षेत्र विकास मिशन सुरू करण्यात आले आहे. पावसाअभावी पिके नष्ट झालेल्या व पाणीटंचाईमुळे पडीक जमिनीच्या प्रमाणात वाढ झालेल्या विदर्भाच्या सहा जिल्ह्यांमध्ये विदर्भ पाणलोटक्षेत्र विकास मिशन सुरू करण्यात आले आहे.

**२७.** राज्यातील खंडकरी शेतकऱ्यांना जमीनवाटप करणे शक्य व्हावे यासाठी, शासनाने, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यामध्ये सुधारणा केली असून या सुधारणेचा लाभ राज्यातील हजारो खंडकरी शेतकऱ्यांना मिळणार आहे.

**२८.** कोकणातील, विशेषतः रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील, बेदखल कुळांना मानीव कूळ म्हणून घोषित करताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आणि त्यासाठीचे वैधानिक निकष सुलभ करण्यासाठी मुंबई कूळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ मध्ये आवश्यक ती सुधारणा करण्यात आली आहे.

**२९.** रोजगार हमी योजनेशी निगडित महाराष्ट्राच्या फलोत्पादन योजनेला मिळालेले यश लक्षात घेऊन, भारत सरकारने देशातील फलोत्पादनाच्या सर्वांगीण विकासाकरिता अलिकडेच राष्ट्रीय फलोत्पादन अभियान हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू केला आहे. चालू वर्षामध्ये, महाराष्ट्र राज्यातील

२३ जिल्ह्यांकरिता १६१ कोटी रुपयांच्या कृतियोजनेला मान्यता देण्यात आली आहे. मर्यादित जलसाठ्याचा जास्तीतजास्त वापर करण्याची गरज ओळखून, भारत सरकारने फलोत्पादनासाठी अलिकडेच सूक्ष्म सिंचन योजना जाहीर केली आहे व त्यासाठीच्या अनुदानाच्या रकमेत २५ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढ केली आहे.

**३०.** पावसाची विषमता, पाण्याची कमतरता, बहुतांशी कोरडवाहू शेती इत्यादी बाबी लक्षात घेऊन, कमी खर्चामध्ये उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी राज्याने महापीक अभियान हा नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे. यात गावपातळीवर दर्जेदार बियाणे निर्मिती, जलसंधारण, सेंद्रीय शेती, लोक सहभाग इत्यादी घटकांचा समावेश आहे. चालू वर्षी, अवर्षण व अतिवृष्टी अशा समस्या असूनही या अभियानाचे परिणाम उत्साहवर्धक आहेत.

**३१.** २००५-०६ या वित्तीय वर्षामध्ये माझ्या राज्यात, केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेखालील खर्चाचा वेग वाढला असून, यावर्षी २७६ गावांना रस्त्यांनी जोडण्यासाठी आणि २३१३ गावांतील रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी १५० कोटी रुपयांहून अधिक खर्च झाला आहे.

**३२.** स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी, दरवर्षी, पंचायत राज मध्ये लक्षणीय कामगिरी करणाऱ्या पंचायत राज संस्थांचा आणि कर्मचाऱ्यांचा गौरव करण्याचे शासनाने ठरविले आहे.

**३३.** शासनाने, ऑगस्ट २००५ मध्ये महाराष्ट्र जलसंपदा नियामक प्राधिकरणाची स्थापना केली असून हे प्राधिकरण, प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामधील भूपृष्ठावरील पाण्याचे व भूजलाचे विनियमन व समन्यायी वितरण करील, पाणीपट्टी आकारणीची पध्दत सुरू करील आणि पाण्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी व टिकवण्यासाठी उपाययोजना हाती घेईल.

**३४.** सन २००५-०६ मध्ये, १९४१ कोटी रुपये इतकी गुंतवणूक करून एक लाख हेक्टर जमीन नव्याने ओलिताखाली आणण्याइतकी सिंचनक्षमता निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

३५. गेल्या वर्षी, राज्याला केंद्र शासनाच्या वेगवर्धित सिंचनलाभ कार्यक्रमाखाली ५२९ कोटी रुपये इतके कर्जसहाय्य प्राप्त झाले असून, आजपर्यंत मिळालेल्या कर्जसहाय्याच्या तुलनेमध्ये ते सर्वात जास्त आहे. २००५-०६ या वर्षामध्ये, ९८ प्रकल्पांकरिता राज्याला १३५२ कोटी रुपये कर्जसहाय्य मिळेल अशी अपेक्षा आहे.

३६. भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत माझ्या शासनाने १७,१७५ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा १८ लाख ४६ हजार हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्याइतकी सिंचनक्षमता निर्माण करण्यासंबंधातील प्रस्ताव भारत सरकारकडे सादर केला आहे.

३७. ग्रामीण पेयजल पुरवठ्यासाठी, राज्य शासन, राज्यातील २६ जिल्ह्यांमध्ये ग्रामस्थांच्या सहभागातून जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी करीत आहे. या प्रकल्पावर सहा वर्षाच्या कालावधीत अंदाजे १३०० कोटी रुपये एवढा खर्च होईल. २००९ सालापर्यन्त ७८०० वस्त्या या प्रकल्पाच्या कक्षेत आणण्यात येतील. सर्व ग्रामस्थांना समान प्रमाणात पिण्याचे पाणी मिळावे म्हणून पिण्याचे पाणी आणि स्वच्छताविषयक प्रकल्प आखणे व त्यांची अंमलबजावणी करणे यासाठी ग्रामस्थांना अधिकार प्रदान करून त्यांची कार्यक्षमता वाढविणे आणि महिलांना सक्षम करणे ही या प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

३८. "स्वजलधारा" या योजनेअंतर्गत, ग्रामस्थ पेयजल पुरवठा योजना आखून त्यांची गावांमध्ये अंमलबजावणी करतात. राज्यात सध्या १७० कोटी रुपये खर्चाच्या सुमारे १६०० योजनांचे काम चालू आहे.

३९. राज्याची **"संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता मोहीम"** ही योजना यशस्वी झाल्यामुळे, त्यापासून प्रेरणा घेऊन, केंद्र सरकारने **"निर्मल ग्राम पुरस्कार"** नावाची योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत गेल्या वर्षी, केंद्र सरकारने देशातील ३९ ग्रामपंचायतींना सन्मानित केले असून त्यामध्ये आपल्या राज्यातील १३ ग्रामपंचायतींना **"निर्मल ग्राम पुरस्कार"** मिळाला आहे.

**४०.** माझ्या शासनाने, काही महत्त्वाच्या रस्त्यांचे चौपदरीकरण करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला असून "बांधा, वापरा व हस्तांतरित करा" योजनेअंतर्गत ८६४ कोटी रुपये रकमेचे सहा प्रकल्प मंजूर केले आहेत.

**४१.** माझ्या शासनाने, मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक व नांदेड या शहरांतील झोपडपट्टीवासीयांसाठी व गरिबांसाठी गृहनिर्माण व पायाभूत सुविधा पुरविण्याकरिता **जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नवीकरण कार्यक्रम** त्याचप्रमाणे राज्यातील इतर शहरांकरिता **एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम** राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

**४२.** माझ्या शासनाने, २००५-०६ या शैक्षणिक वर्षापासून विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जा वाढवून त्यांना "सेंटर्स ऑफ एक्सलन्स" करण्याची एक केंद्र पुरस्कृत योजना सुरू केली आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात, १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची निवड करण्यात आली असून पुढील ४ वर्षांत सुमारे ५० संस्थांना ती लागू करण्यात येणार आहे.

**४३.** माझ्या शासनाने, १०० वर्षे पूर्ण केलेल्या ७७ ग्रंथालयांना त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी आणि जुन्या व दुर्मीळ ग्रंथांचे जतन करण्यासाठी प्रत्येकी पाच लाख रुपये अनुदान मंजूर केले आहे.

**४४.** लेप्टोस्पायरोसेससारख्या संसर्गजन्य रोगांचे त्वरित व अचूक निदान करण्याकरिता, धीरुभाई अंबानी फाऊंडेशन आणि काही मान्यवर व्यक्तींच्या सहाय्याने, मुंबईतील परळ इथल्या हाफकिन इन्स्टिट्यूटमध्ये एक अत्याधुनिक मध्यवर्ती प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे.

**४५.** शुश्रूषा क्षेत्रामध्ये आवश्यक असलेली वाढती व्यावसायिकता लक्षात घेऊन माझ्या शासनाने, सन २००६-०७ पासून मुंबई व नागपूर येथील विद्यमान नर्सिंग स्कूलची दर्जावाढ करून तेथे बी. एससी. नर्सिंग हा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

४६. माझ्या शासनाने, प्राथमिक आरोग्य केंद्रे व रुग्णालयांमधील पायाभूत सुविधा व सेवा सुधारण्यासाठी राज्य ग्रामीण आरोग्य अभियान सुरू केले आहे. या अभियानाचा एक मोठा फायदा असा की, त्यामुळे आरोग्याशी निगडित पाणीपुरवठा, स्वच्छता, पोषणआहार व आरोग्य सेवा या कार्यक्रमांचा एकत्रितपणे विचार करणे शक्य होईल.

४७. नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर परिसरात कोंबड्यांना बर्ड फ्ल्यूची लागण झाल्याचे निश्चित झाल्यानंतर तातडीने कृती आराखडा तयार करून त्यानुसार, या भागातील १० किलोमीटर परिसरातील ३ लाख १८ हजार कोंबड्या शास्त्रीय पद्धतीने नष्ट करण्यात आल्या आहेत. तसेच, हा रोग नवापूर परिसराबाहेर पसरू नये म्हणून आवश्यक ते सर्व उपाय योजण्यात आले आहेत. त्यामुळे आता हा रोग राज्यात संपूर्ण नियंत्रणाखाली आणण्यात आला आहे. तसेच, ज्यांच्या कोंबड्या नष्ट केल्या आहेत, अशा पोल्ट्री फार्मच्या मालकांना नुकसानभरपाई देण्यात येत आहे. सदर कामासाठी आवश्यक असणारा सर्व निधी शासनाने यापूर्वीच उपलब्ध करून दिलेला आहे.

४८. कुष्ठरोगामुळे अपंग व निराधार झालेल्या व्यक्तींना देय असलेले दरमहा २५० रुपये अर्थसहाय्य ५०० रुपये इतके वाढविण्याचा निर्णय माझ्या शासनाने घेतला आहे.

४९. अनुसूचित जातीच्या युवकांचे पोलीस दल आणि सैन्य दलातील भरतीचे प्रमाण वाढविण्यासाठी त्यांना विशेष पूर्वप्रशिक्षण देण्यात येणार आहे. या तीन महिन्यांच्या निवासी प्रशिक्षणाकरिता प्रति प्रशिक्षणार्थी ८५०० रुपये इतका खर्च करण्यात येणार आहे.

**५०.** आदिवासी मुलांना समर्थ बनविण्यासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, माझ्या शासनाने, ठाणे, नाशिक, नंदूरबार, अमरावती व गडचिरोली या प्रामुख्याने आदिवासींचे वास्तव्य असणाऱ्या जिल्ह्यांच्या मुख्य ठिकाणी, इंग्रजी माध्यमाच्या ५ निवासी शाळा स्थापन करण्याचे ठरविले आहे.

**५१.** आदिवासींच्या जलद विकासाच्या दृष्टीने रस्ते जोडणी व सिंचन सुविधा या अत्यंत महत्त्वाच्या बाबी आहेत. माझ्या शासनाने या दोन्ही क्षेत्रांसाठीच्या तरतुदीत भरीव वाढ केलेली आहे.

**५२.** माझ्या शासनाने, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाड्यांना आहार पुरवठा करण्याच्या कामी महिलांचे स्वयंसहाय्यता गट आणि महिला मंडळे यांना सहभागी करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात सुमारे ६५ हजार अंगणवाड्या असून तेथे सहा वर्षाखालील सुमारे ५३ लक्ष मुलांना पूरक आहार आणि लसीकरण, शालेयपूर्व शिक्षण व आरोग्य सेवा या सुविधा पुरविण्यात येतात. या निर्णयामुळे, अंगणवाड्यांमध्ये पुरविण्यात येणारा आहार व सेवा यांचा दर्जा सुधारण्याबरोबरच, महिला बचत गट व महिलामंडळे सक्षम होण्यास आणि महिलांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत होईल.

**५३.** माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा दिनांक १२ ऑक्टोबर, २००५ पासून अंमलात आला आहे. त्यानुसार, माझ्या शासनाने महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाची स्थापना केली असून त्यावर राज्य मुख्य माहिती आयुक्त यांची नियुक्ती केली आहे.

**५४.** राष्ट्रीय विधि साक्षरता अभियान राज्यात अतिशय जोमाने राबविण्यात येत आहे. २००५ या वर्षामध्ये सर्व राज्यभर सुमारे १७०० साक्षरता शिबिरे आयोजित करण्यात आली होती.

**५५.** माझ्या शासनाने, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी **महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरणाची** स्थापना करण्याचा निर्णय घेतलेला आहे. पुनर्वसन धोरणाची आखणी, त्याचे नियोजन व अंमलबजावणी याची संपूर्ण जबाबदारी या प्राधिकरणाकडे असेल.

**५६.** सन २००८ मध्ये **गुरु-ता-गद्दीला** ३०० वर्षे पूर्ण होत आहेत. या शुभप्रसंगी, नांदेड येथे त्रिशताब्दी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या त्रिशताब्दी सोहळ्यासाठी देशातून तसेच विदेशांतून लाखो भाविक येतील अशी अपेक्षा आहे. त्यादृष्टीने, नांदेडमधील पायाभूत सुविधा बळकट करणे तसेच पवित्र स्थळाभोवतालच्या परिसराचा विकास करणे इत्यादी कामांसाठी माझ्या शासनाने ८१७ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यास मान्यता दिली आहे.

**५७.** माझ्या शासनाने, मराठी नाट्यचळवळीला प्रोत्साहन देण्याकरिता, मराठी नाट्यसंस्थांना नवीन नाट्यनिर्मितीसाठी अनुदान देण्याचे जाहीर केले आहे. त्याचप्रमाणे, माझ्या शासनाने मराठी रंगभूमीसाठी बहुमोल योगदान देणाऱ्या ज्येष्ठ रंगकर्मीला दरवर्षी जीवनगौरव पुरस्कार देण्याचे ठरविले आहे.

**५८.** आधुनिक मराठी कवितेतील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व **श्री. विंदा करंदीकर** यांची साहित्यातील सर्वोच्च बहुमानाच्या समजल्या जाणाऱ्या **ज्ञानपीठ पुरस्कारासाठी** निवड करण्यात आली आहे, ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. मी आपल्या सर्वांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो. त्यांना जाहीर झालेला हा पुरस्कार मराठी भाषेचा, मराठी कवितेचा आणि काव्यपरंपरेचा सन्मान आहे.

**५९.** दीर्घकाळ प्रलंबित असलेला महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्यासाठी माझ्या शासनाने, संविधानाच्या अनुच्छेद १३१(ख) अन्वये, सर्वोच्च न्यायालयात एक विशेष दिवाणी दावा दाखल केला असून तो वाद सोडविण्यासाठी माझे शासन कटिबद्ध असल्याचा मी पुनरुच्चार करतो.

६०. सन्माननीय सदस्यहो, या अधिवेशनात पूरक मागण्या, २००६-०७ चा अर्थसंकल्प, लेखानुदान, विवक्षित अध्यादेशांचे अधिनियमांमध्ये रूपांतर करणारी विधेयके आणि नवीन विधेयके, तसेच, आपल्यापुढे विचारार्थ मांडण्यात येईल असे इतर शासकीय व अशासकीय कामकाज, यांवर आपल्याला विचार करावयाचा आहे.

या अधिवेशनातील आपल्या सर्व विचारविमर्शास मी सुयश चिंतितो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र ! !**